Review Of Research ISSN : 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF)
Volume-4 | Issue-7 | April-2015 Available online at www.ror.isrj.org

# तौलनिक साहित्याभ्यास आणि राष्ट्रीय एकात्मता



वसूमती पी. पाटील

मराठी विभाग प्रमुख ,व्ही.यु.पाटील कला व कै.डॉ.बी.एस.देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री (धुळे)

**Short Profile**

Vasumati P. Patil is working as an Assistant Professor at Department of Marathi in V.U. Patil Arts and Dr. B. S. Desale Science College, Sakri (Dhule).She has completed M.A., M.Ed., SET., Ph.D. She has professional experience of 16 years and research experience of 6 years.

**Abstract (सारांश) :-**



तौलनिक साहित्याभ्यासमध्ये साहित्याचे सर्व प्रवाह आणि संस्कृतीचे इतर प्रवाह समाविष्ट असल्यामुळे त्याची कक्षा व्यापक असते. तौलनिक साहित्याभ्यासात एका साहित्याची दुसऱ्या अनेक साहित्यांशी व इतर मानवी आविष्कार क्षेत्रांशी, केलेली तुलना अंतभूत असते. समाजशास्त्र, प्राकृतिक विज्ञान, धर्म, कायदा, राज्यशास्त्र इ. अनेक क्षेत्रांमध्येही तुलनेचा उपयोग होतो. साहित्यक्षेत्रही त्याला अपवाद नाही. साहित्यातील मानवी जीवनाची भावनात्मक एकरुपता भिन्न-भिन्न संस्कृतींना एकत्रित आणण्याचे कार्य करते. राष्ट्रीय एकात्मता हा सर्व तऱ्हेच्या भिन्नतेला एकत्र जोडणारा भावनात्मक धागा आहे. सांस्कृतिक एकोपा जपणे, सांस्कृतिक संघर्षाला आळा बसविण्याचे महत्वपूर्ण कार्य तौलनिक साहित्याभ्यास द्वारा होत असते.

**मुख्य मुद्दे :-**

१) तौलनिक साहित्याभ्यासाचा मानवी आविष्कार क्षेत्रांशी असलेला संबंध

२) भावनिक एकरुपता

३) सांस्कृतिक ऐक्य

४) राष्ट्रीय एकात्मता

**प्रस्तावना :-**

मानवाला बुध्दी प्राप्त झाल्यापासुन वास्तविक व्यवहार आणि आदर्श विचार विनिमय यामध्ये प्रत्येक व्यक्ती तुलना करु पाहते. दो-न िंवा दोन पेक्षा जास्त वस्तुंमध्ये किंवा कोणत्याही बाबींमध्ये प्रकट-अप्रकट तुलना करणे आणि त्या तुलनेनुसार निवड करणे जणू मानवाची सहज प्रवृत्ती आहे असे वाटू लागते. दैनंदिन व्यवहारात होणाऱ्या तुलनेत व्यक्तीच्या वैयक्तिक आवड-निवड, राग-द्वेष इ. बाबींना अवकाश मिळतो. परंतु एखाद्या ज्ञान प्रक्रियेच्या बाबतीत अशी तुलना मांडली तर त्यातील राग द्वेष, अहम् इ. निघुन जातो.

**१) तौलनिक साहित्याभ्यास :-**

साहित्याच्या अभ्यासात तुलनेला ए वस्तुनिष्ठ पध्दती म्हणून प्रयोजित केली जाते. तुलनेत तटस्थता आणि वस्तुनिष्ठता असली पाहिजे. समाजशास्त्र, प्राकृतिक विज्ञान, धर्म, कायदा, राज्यशास्त्र इ. सारख्या अनेक क्षेत्रांमध्ये तुलनेच्या उपयोग होतो. त्यादृष्टिने मानव संकुचिततेमधून निघुन व्यापक दृष्टिकाणाने पाहु लागला. तसेच साहित्यक्षेत्र ही त्याला अपवाद नाही. साहित्याशी जवळीक साधून त्याचा सखोल अभ्यास रे तुलनात्मक अभ्यासात महत्वाचे असते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये साहित्याचे सर्व प्रवाह आणि संस्कृतीचे इतर प्रवाह देखील समाविष्ट होत असल्यामुळे त्याची कक्षा व्यापक असते. त्याचप्रमाणे "प्रकट तुलना करणे हे या साहित्याभ्यासाचे प्रमुख लक्षण असते. त्यास तौलनिक साहित्याभ्यास"[१] म्हणता येईल.

तौलनि साहित्याभ्यासात मात्र भिन्नभाषिक साहित्यांचा तुलनात्मक विचार करण्याला पर्याय नाही. तुलनात्म अभ्यास केल्यास त्यामध्ये काही साम्य आढळून येते. त्या त्या साम्यमुळे त्या त्या साहित्यकाची प्रतिभा आणि त्या साहित्यकृतीची कलात्मकता लक्षात येते. तसेच साहित्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटत असते. प्रत्येक समाजाच्या चाली, रीती,प्रथा, रुढी, परंपरा यामध्ये भिन्नता आढळून येते. भिन्न भिन्न भाषेतील साहित्याचा तुलनात्म अभ्यास केल्यास त्यामध्ये वैधर्म्यही दिसून येते. त्याचप्रमाणे त्या त्या साहित्यावर सभोवतालच्या परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. हे पण लक्षात येते. कारण विश्वातील प्रत्येक प्रजेचे साहित्य हे त्या त्या संस्कृतीचे संवेदनशील रुप असते. त्यामध्ये संवेदना, मानवी मनाची अनंत अनुभूती दडलेली असते. मानवी मनाच्या या अनुभूतीक्षमतेची प्रचीती होण्यासाठी विश्वातील समग्र साहित्याचा तुलनात्मक अभ्यास केला पाहिजे. कारण सांस्कृतिक एकता टिकविण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्व अनन्य साधारण आहे. तसेच तुलनात्मक अभ्यास वाचकास संस्कृती आणि साहित्यामधील घनिष्ठ संबंध स्पष्ट करुन देत असतो. तसेच साहित्याच्या आस्वादप्रक्रियेत देखील एका नवीन परिणामाची भर टाकीत असतो. इतकेच नव्हे तर तौलनिक साहित्याच्या अभ्यासकाची जाणीव प्रगल्भ होते. आपली संस्कृती भाषा यांमधून बाहेर पडून एक व्यापक दृष्टिकोन अभ्यासकाला प्राप्त होतो. त्यामुळे सांस्कृतिक प्रगल्भता वाढीस लागते.

**२) राष्ट्रीय एकात्मता :-**

राष्ट्रीय एात्मता हा सर्व तऱ्हेच्या भिन्नतेला एकत्र जोडणारा भावनात्मक धागा आहे. भिन्न-भिन्न संस्कृती एकत्रित आल्यास राष्ट्रीय एकात्मतेस एक पूर्णता लाभते. त्या पुर्णतेसाठीच साहित्य संस्कृतीचा स्मृतीसंचय अत्यंत महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतो. भारतीय संस्कृती वैविध्यपूर्ण आहे. साहित्य म्हणजे नवनवोन्मेष शालीनी मानवी चैतन्याचे प्रतिबिंब होय. त्या साहित्य द्वारा भौगोलिक विभिन्नता असली तरी मानवैक्य जपण्याचे प्रयत्न होत असतात. त्या दृष्टिने राष्ट्रीय एकात्मतेची व्याख्या डॉ. संपूर्णानंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमेलेल्या राष्ट्रीय व भावनात्मक समितीच्या अहवालात पुढीलप्रमाणे दिली आहे,-"संकुचित, प्रादेशिक, वर्गीय वा पक्षीय हिताचा त्याग करुन राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याच्या वृत्तीला प्रेरणा देणारी मनोभूमिका तयार करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय." [२] त्यानुसार अशी मनोवृत्ती-भूमिका साहित्य निर्माण करीत असते. राष्ट्रीय साहित्य हे त्या त्या राष्ट्राचे आणि राष्ट्रातील संस्कृतीच्या एक किंवा अनेक भाषांचे साहित्य असते. इतकेच नव्हे तर त्या त्या राष्ट्राची वैशिष्टये व

णधर्म यांचा संबंध त्या त्या राष्ट्राच्या साहित्याशी असतो त्यानुसार राष्ट्रीय साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण मांडतांना प्रा. रा.ग. जाधव यांनी आपले मत नोंदविलेले आहे की,-" या गुणधर्माचा संबंध त्या त्या राष्ट्रीय समाजाचा इतिहास, भुगोल, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थिती गती भाषा वैशिष्टये यांसारख्या घटकांनी मिळून जी समग्र अवस्था अस्तित्वात असते, त्या समग्र अवस्थेशी असतो."[३] अर्थातच् भाषा वैविध्य आणि सांस्कृतिक वैविध्य यातील साम्य -भेद जाणून घेण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास अत्यावश्यक आहे.

### ३) तौलनिक साहित्याभ्यास व राष्ट्रीय एकात्मता :-

मानव संकुचिततेमधून निघून व्यापक दृष्टिकोणाने पाहणार तरच मानवजातीचा सांस्कृतिक वारसा संवर्धित होऊ शकतो. जेव्हा आपण राष्ट्रीय साहित्याचा विचार करतो तेव्हा पुढे उदयास आलेल्या विश्वासाहित्याकडे पाहू शकतो. त्यादृष्टिने तौलनिक साहित्याभ्यासाचे अनन्यसाधारण महत्व आहे. प्रत्येक देश, राज्य यांना आपली भाषा आपली संस्कृती असते. वाढत्या दळणवळण व प्रसारमाध्यमांमुळे मात्र त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक सीमा अस्पष्ट झाल्या आहेत. त्याचे कारण व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण इत्यादी कारणांमुळे मानवाचे स्थलांतर व दूसरे म्हणजे जग जवळ आले आहे असे म्हणत असतांना साहजिकच शेजारच्या संस्कृतीची वैशिष्टये जाणून घेणे, त्याबद्दल आकर्षण वाटणे अपेक्षित आहे. देशाच्या उज्वल भविष्यासाठी ज्या प्रमाणे भौगोलिक, राजकीय, सामाजिक ऐक्य आवश्यक आहे त्याचप्रमाणे सांस्कृतिक ऐक्य ही आवश्यक आहे. अशा वेळी तौलनिक साहित्याभ्यास उपयुक्त ठरत असतो. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये फक्त एका साहित्याची अने साहित्याशी केलेली तुलनाच अपेक्षित नसुन साहित्येतर कला तत्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, प्राकृतिकविज्ञान, धर्म, कायदा, राज्यशास्त्र इ. अनेक मानवी अविष्कारक्षेत्रांची तुलना ही अंतर्भूत असते. त्या दृष्टिने साहित्याच्या अंतरंगाच्या प्राप्तीसाठी समग्र संस्कृतीच्या संदर्भात अध्ययन होणे गरजेचे ठरते. तेव्हाच मानवी मनाच्या अनुभूती क्षमतेची दिशा व प्रचिती सिध्द होते. परंतू त्यासाठी कोणत्याही राष्ट्राने फक्त स्वात:च्या साहित्याच्या अभ्यासातील मर्यादा सीमित ठेवणे उचित ठरणार नाही. लोकांमध्ये अनेक वेळा अंध राष्ट्रवाद, प्रांतवाद, सीमावाद, भाषावाद यांचे कुचकामी विचार दिसून येतात त्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी केवळ कोणत्याही एका भाषेतील साहित्याच्या अभ्यासाने ते शक्य होार नाही. चैतन्यपूर्ण रसास्वाद, स्वस्थ आणि संवादी संवेदना सिध्द करण्यासाठी, समूहातील शहाणपण शोधण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास गरजेचा आहे. त्यामुळे आपल्या संस्कृतीचा वारसा समृध्द होत असतो. संस्कृती सतत परिवर्तनशील असते. "मानवी समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरुप निर्मिती व त्याचप्रमाणे डोळयांना न दिसणारी परंतू विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टि म्हणजे संस्कृती होय. इरावती कर्वे" [४] कोणतीही एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीमधून दीर्घकाळ अलिप्त राहू शकत नाही. अर्थात संस्कृतीचा पयार्याने साहित्याचा व त्याच अनुषंगाने मानवी जीवनाचा तुलनात्मक अभ्यास केल्यास राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. कारण संस्कृती समाजाचे ज्ञानभांडार आहे. प्रत्येक समाजाने आपल्या संस्कृतीनुसार साहित्य निर्माण केले पाहिजे. संस्कृतीत काही प्रमाणके मूल्य, श्रध्दा यांचा देखील समावेश होत असतो. त्यानुसार अनेक प्रदेशांमध्ये राष्ट्रांमध्ये समान असे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक वातावरण असते. परंतू ते एकमोंशी परिचित नसतात अशावेळी तुलनात्मक साहित्याभ्यास द्वारा भिन्न भिन्न संस्कृती समीप येऊन राष्ट्रीय एकात्मता निर्माण होत असते. अस्मिता जागृतीसाठी अनेक विध साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाची आज नितांत गरज आहे.

ोणत्याही प्रजेच्या संस्कृती मध्ये त्या त्या प्रजेची कल्पनाशक्ति, ज्ञान, नैतिक सिध्दांत समाविष्ट असतात. संस्कृतीच्या साहित्यामध्ये अन्य क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी तुलनात्मक साहित्याभ्यास अगत्यपूर्ण आहे. कारण प्रजेचे साहित्य त्याच्या संस्कृतीचे अत्यंत सूक्ष्म हृदयगम्य अभिव्यक्तीचे फलित रुप असते. त्यामधून त्या त्या राष्ट्राचे चित्र समोर येत असते. राष्ट्रीय एकात्मा वाढीसाठी संस्कृतीचे समृध्द असणे रजेचे आहे. दोन भिन्न राष्ट्रे अथवा दोन परस्पर भिन्न संस्कृती यांच्यामध्ये आदान प्रदान होण्याचे महत्वपूर्ण माध्यम म्हणजे तुलनात्मक साहित्याभ्यास होय. राष्ट्राच्या सांस्कृतिक विकास आणि समृध्दतेमुळे राष्ट्रीय अस्मिता जागृत होते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये भिन्न भिन्न परंपरांचे भान ठेवणे,

साहित्यातील साम्य आणि विरोध यांचा शोध घेऊन त्याची कारण मीमांसा करणे अपेक्षित असते. त्यादृष्टिने तुलनात्मक साहित्याच्या अभ्यासेक्षात दृष्टिकोणामध्ये विविधता दिसून येते. तौलनिक साहित्याभ्यास करणाऱ्या अभ्यासकाने डोळे व कान जागृत ठेवले पाहिजे. त्यामुळे साहित्यिक सर्जक किंवा साहित्यकृतीचे प्रतिध्वनी ऐकू येत असले तरी राष्ट्रीय सूर ही त्यामूधन गवसतात. अर्थात तौलनिक साहित्याभ्यासातून मानवीय संबंध अधिक मुल्यात्मक होतांना दिसतात. राष्ट्रीय एकात्मतेसाठी हा अत्यंत महत्वपूर्ण धागा आहे. सर्वत्र मानवी स्वभावाचे गुणधर्म समान असल्यामुळे साहित्याच्या निर्मितीमध्ये आणि स्वरुपामध्ये विश्वात्मकता असते. साहित्य आपणास राष्ट्रीय अखंडताची जाणीव करुन देत असते. मानवा मानवामध्ये भावनात्मक एकरुपता निर्माण करण्यासाठी अनेकविध साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाचे महत्व आहे. त्यामुळे भिन्न-भिन्न भाषिक साहित्यातुन भावनिक एकरुपतेची प्रचीती येते. परस्परांच्या संस्कृती परंपरांबद्दल योग्य आदरभाव निर्माण होऊन द्वेषभाव हेवे दावे नाहीसे झाल्यास राष्ट्रीय एकात्मता बळकट होते. भिन्न भिन्न परंपरा, भाषा साहित्य, संस्कृतीचा देखील अभिमान बाळगला असता राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची आवश्यकता भासणार नाही. देशाचे ऐक्य म्हणजे निव्वळ धर्म, संस्कृती, भाषा, चालीरिती यांमध्ये दिस[illegible]ारा वरपां[illegible] एकसारखेपणा नसून भिन्नधर्मीय, भिन्नप्रांतीय माणसा माणसांमध्ये नांदणारा एकमेकांबद्दलचा जिव्हाळा होय, भिन्नभिन्न साहित्याच्या तुलनात्मक अभ्यास केल्यामुळेच परस्परांबाबतीत आदर टिकून राहण्यास मदत होते. भारतासारख्या विविधतेने संपन्न असलेल्या देशात तौलनिक साहित्याभ्यासाची उपयुक्तता अधिकच आहे. तौलनिक साहित्याभ्यासांमध्ये विविध साहित्यांचा तुलनात्मक अभ्यास करतांना एक बाब महत्वपुर्ण असते की माणसाचे सार्वत्रिक मूल्य केंद्रीभूत असते. प्रत्येक देशाची संस्कृती भिन्न असून त्या त्या संस्कृती विशेषांचा अभ्यास करतांना मानवी संस्कृतीच्या प्रमाणकांचा विचार देखील केला जातो. कारण माणसांच्या भावना सर्वत्र समान असतात. त्यांच्या अभिव्यक्ति मध्ये बदल दिसत असला तरी प्रेरणा व भावना यांच्यात मुलभूत साम्य असते. त्याचा अभ्यास करणे हे तुलनात्मक पध्दतीचे कार्य असते. आजच्या गतिमान युगात मानवी जीवन व्यामिश्र गुंतागुंतीचे झाले आहे. इतकेच नाही तर मानवी जीवनाची अस्थिरता वाढल्यामुळे मानवाचा निसर्गाशी विसंवाद, सामाजिक संस्थांचा विध्वंश, सामूहिक जीवनातील एकलकोंडेपणा, नैराश्य, सर्जनशीलतेचा अभाव या सर्व गोष्टींचा प्रभाव मनुष्यजीवनावर होतांना दिसून येतो. त्यामुळे मानवी जीवन अशांत आहे. समाजाचे चित्र बदलले आहे. समाजातील सांस्कृतिक ऱ्हास व मानवतावादाचा ऱ्हास होतांना दिसतो आहे तो टाळणे आवश्यक आहे. मानवीसमूहाची समाजाप्रती, राष्ट्राप्रती आत्मीयमता दिसत नाही. साहित्याच्या माध्यमातून मानवीजीवनाचे प्रतिबिंब स्पष्ट होत असते. सृष्टीवरील असंख्य, देश भाषा असल्या तरी मात्र मानव हा सर्वत्र एकच जगात जिथे जिथे मानवी समाज आहे तिथे तिथे सामाजिक परिवर्तन प्रक्रिया गतिमान असते. प्रत्येक समस्यांचे स्वरुप भिन्न भिन्न आहे. परंतू अनेक समस्या अशा आहेत की त्या सृष्टिवरील सर्वच मानवांना स्पर्श करतात. जसे की श्रीमंत-[illegible]रीब, स्त्री-पुरुष, भाषा-जाती भेद इ. या सर्व समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य साहित्य करीत असते. अशा साहित्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्याने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवणे सहज शक्य होते. सांस्कृतिक एकोपा अत्यंत महत्वपूर्ण असतो. कारण 'स्व' चा अतिरेक सांस्कृतिक विनाश घडवू शकतो. आजचे चित्र पाहता लक्षात येते की, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये होणाऱ्या अंतर्बाहय बदलांमुळे नवनवीन सांस्कृतिक संघर्ष निर्माण होत आहेत. अशावेळी वैयक्तिक स्वार्थ आणि व्यापक समाजहित प्रत्येक व्यक्तीच्या मनात निर्माण करण्याचे काम तौलनिक साहित्याभ्यास द्वारा होत असतांना पर्यायानेच राष्ट्रीय एकात्मता या मुल्याची जोपासण होते असे म्हणणे यथार्थ ठरेल. कारण सांस्कृतिक विनाश म्हणजे देशाची हानि होय. सांस्कृतिक एकोपा जतन करण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**संदर्भ सुची :-**

**१)** बापट वसंत : तौलनिक साहित्याभ्यास, मूलतत्वे आणि दिशा मौज प्रकाशन गृह मुंबई प्र.आ. सप्टें, १९८१, पृ.-१७

**२)** [illegible]डले म.बा. : शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र, पृ.-४४१

**३)** जाधव रा.ग. : भारतीय साहित्याची संकल्पना, पृ.-२९

**४)** □ुल□□ी पी.के. : सामान्य समाजशास्त्र,पृ.-२७

**5)** देसाई आश्विन : अंगुलिनिर्देश 211002